महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती


# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २०१ वे दिनांक : १५/०७/२०२६ वार : बुधवार

## ३० जुलैपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात कर्जमाफीची रक्कम; कृषीमंत्र्यांची घोषणा



**मुंबई :** राज्यातील बोगस सोयाबीन बियाणे प्रकरणात सरकारने कडक भूमिका घेतली असून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या १८ बियाणे कंपन्यांविरोधात कठोर कारवाई सुरू करण्यात आली आहे. कृषिमंत्री दत्ता भरणे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी त्यांनी कर्जमाफी, पावसाची स्थिती, पिकांचे नुकसान आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत चर्चांवरही भूमिका स्पष्ट केली.

भरणे म्हणाले की, राज्यातील अनेक शेतकऱ्यांनी पेरलेले सोयाबीन बियाणे उगवले नसल्याच्या तक्रारी कृषी विभागाकडे मोठ्या प्रमाणावर आल्या. त्यानंतर कृषी विभागाने तातडीने तपासणी मोहीम राबवली. सर्वाधिक तक्रारी अकोला, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा, वर्धा, चंद्रपूर, नागपूर, वाशिम, लातूर आणि धाराशिव या दहा जिल्ह्यांतून प्राप्त झाल्या.

कृषिमंत्र्यांनी सांगितले की, राज्यभरातून सोयाबीन बियाण्यांचे ५,६३८ नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. त्यापैकी ५८१ नमुने अप्रमाणित आढळले. या प्रकरणात संबंधित कंपन्यांविरोधात १८१ न्यायालयीन प्रकरणे दाखल करण्यात येत आहेत.

उगवण क्षमतेबाबत आलेल्या ३,६१५ तक्रारींपैकी १,७३८ तक्रारींची तालुकास्तरीय समित्यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन तपासणी केली आहे. एकूण १८ बियाणे कंपन्यांविरोधात मोठ्या प्रमाणावर तक्रारी आल्या असून दोषी कंपन्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यापैकी बूस्टर प्लांट जेनेटिक्स लिमिटेड, रवी हायब्रिड, पार्श्व जेनेटिक्स, इनोव्हा सीड्स, ओसवाल सीड्स, केडीएम सीड्स, ग्रीन गोल्ड सीड्स, आदित्य सीड्स, अंकुर सीड्स, श्री सीड्स आदी कंपन्यांविरोधात तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत. बूस्टर प्लांट जेनेटिक्सविरोधात तीन तर रवी हायब्रिड सीड्सविरोधात एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भरणे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः या प्रकरणात कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत. ज्या ठिकाणी आवश्यक असेल तेथे शेतकऱ्यांना बियाणे बदलून देण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. भविष्यात अशा प्रकारे शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही.

कर्जमाफीबाबत बोलताना भरणे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३० जूनपर्यंत कर्जमाफी देण्याची घोषणा केली होती. मात्र त्यानंतर पावसाळी अधिवेशन, पुरवणी मागण्या आणि राज्यपालांच्या मंजुरीची प्रक्रिया पूर्ण करावी लागली. आता ही प्रक्रिया पूर्ण झाली असून आयकर भरणाऱ्या शेतकऱ्यांची यादी केंद्र सरकारकडून मिळाल्यानंतर लाभार्थ्यांची अंतिम यादी निश्चित केली जाईल.

त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री स्वतः केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याशी याबाबत चर्चा केली असून आवश्यक माहिती लवकरच उपलब्ध होईल. ३० जुलैपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात कर्जमाफीची रक्कम जमा करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

भरणे यांच्या मते, या योजनेचा लाभ सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार असून कर्जमाफीचा एकूण खर्च ३६ हजार कोटी रुपयांवरून वाढून सुमारे ४१ ते ४२ हजार कोटी रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

राज्यातील पावसाच्या स्थितीबाबत त्यांनी सांगितले की, हवामान बदलामुळे काही भागांत जास्त तर काही भागांत कमी पाऊस होत आहे. पावसामुळे ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, त्यांच्या पंचनाम्याचे आदेश महसूल आणि कृषी विभागाला देण्यात आले आहेत. अहवाल आल्यानंतर नुकसानग्रस्तांना मदत केली जाईल.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार विदर्भात २० ते २५ जुलैनंतर पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. राज्यात आतापर्यंत सुमारे ६७ टक्के पेरणी झाली असून अमरावती विभागात सर्वाधिक तर नंदुरबार विभागात सर्वात कमी पेरणी झाली आहे. जुलैअखेर राज्यात अपेक्षित पेरणी पूर्ण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत मतभेदांच्या चर्चेवर बोलताना दत्ता भरणे म्हणाले की, पक्षासमोर कोणतेही आव्हान नाही. सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्ष भक्कम असून प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ यांसारखे वरिष्ठ नेते पक्षात सक्रिय आहेत. काहीजण प्रसिद्धीसाठी अशा प्रकारची विधाने करत असतात, त्याला आम्ही कोणतेही महत्त्व देत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## पिंक ई-रिक्षा योजनेला मोठा दिलासा; अनुदानात दुप्पट वाढ





**मुंबई :** राज्यातील महिलांना आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर आणि स्वावलंबी बनवण्यासाठी राबवल्या जाणाऱ्या 'पिंक ई-रिक्षा' योजनेबाबत राज्य मंत्रिमंडळाने एक अतिशय ऐतिहासिक आणि मोठा निर्णय घेतला आहे. महिला व बाल विकास विभागाच्या या योजनेअंतर्गत ई-रिक्षा खरेदीसाठी मिळणाऱ्या अनुदानात दुप्पट वाढ करण्यात आली आहे. ते आता २० टक्क्यांवरून थेट ४० टक्के करण्यात आले आहे. विशेष म्हणजे हा निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू होणार असल्याने, यापूर्वी रिक्षा मिळालेल्या महिलांनाही या वाढीव अनुदानाचा थेट फायदा मिळणार आहे.

महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली राबवल्या जाणाऱ्या या योजनेचा वेग वाढवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील राज्य मंत्रिमंडळाने या महत्त्वपूर्ण प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. योजनेअंतर्गत अनुदानात थेट दुप्पट वाढ झाल्यामुळे लाभार्थी महिलांवरील कर्जाचा भार आता मोठ्या प्रमाणावर कमी होणार आहे.

या मंत्रिमंडळ निर्णयाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, हा निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू केला जाणार आहे. याचाच अर्थ असा की, ज्या महिला भगिनींना यापूर्वीच 'पिंक ई-रिक्षा'चे वाटप झाले आहे, त्यांनाही आता कर्ज परतफेडीसाठी जुन्या २० टक्क्यांऐवजी सुधारित ४० टक्के शासन अनुदान दिले जाणार आहे. यामुळे जुन्या लाभार्थींना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे.

योजनेच्या नव्या अटींनुसार, ई-रिक्षा खरेदीसाठी लाभार्थी महिलेला स्वतःच्या खिशातून किमान १० टक्के रक्कम भरावी लागेल. रिक्षाच्या एकूण किमतीपैकी ४० टक्के रक्कम शासन अनुदान म्हणून देईल. तर उर्वरित ५० टक्के रक्कम पुरवठादार कंपनीकडून बिनव्याजी 'पार्शियल डेफर्ड पेमेंट फॅसिलिटी' द्वारे किंवा विविध सहकारी व राष्ट्रीयीकृत बँकांकडून अत्यंत सुलभ कर्ज स्वरूपात उपलब्ध करून दिली जाईल.

या संपूर्ण अनुदानाचे वाटप 'आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे' यांच्या कार्यालयामार्फत अत्यंत पारदर्शक पद्धतीने थेट केले जाणार आहे. या योजनेत भविष्यात अतिरिक्त जिल्ह्यांचा समावेश करणे, लाभार्थी संख्येचे जिल्हानिहाय फेरवाटप करणे आणि अंमलबजावणीदरम्यान काही तांत्रिक अडचणी आल्यास आवश्यकतेनुसार योग्य ते बदल करण्याचे सर्व सर्वाधिकार महिला व बालविकास विभागाकडे सोपवण्यात आले आहेत. शासनाच्या या निर्णयामुळे महिलांच्या प्रगतीचा मार्ग अधिक सुकर होणार आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १५ जुलै २०२६

## हमीद तडवी राज्य माध्यम समन्वयकपदी



**जळगाव (प्रतिनिधी) :** सामाजिक न्याय, मानवी हक्क आणि शांततेच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या आंतरराष्ट्रीय मानवाधिकार शांतता विकास संघटना (IHRPDA) ने मुख्य सिईओ (डायरेक्टर)इमरान परवेज साहेब (सर) यांच्या आदेशानुसार हमीद इस्माईल तडवी यांची महाराष्ट्र राज्य माध्यम समन्वयक म्हणून अधिकृत नियुक्ती केली आहे. संघटनेकडून त्यांना अधिकृत ओळखपत्र (ID) प्रदान करण्यात आले असून, राज्यभर संघटनेच्या माध्यम समन्वयाची महत्त्वाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.या नियुक्तीमुळे महाराष्ट्रातील मानवाधिकार, सामाजिक न्याय, शांतता आणि जनजागृतीविषयक उपक्रमांना अधिक प्रभावीपणे प्रसिद्धी मिळणार असून, संघटनेच्या कार्याचा विस्तार करण्यास मदत होणार आहे.आंतरराष्ट्रीय मानवाधिकार शांतता विकास संघटना (IHRPDA) ही "मानवता, शांती, न्याय आणि समानता" या ध्येयवाक्याने कार्यरत असून, देशभरात मानवी हक्कांचे संरक्षण, सामाजिक सलोखा, शांतता प्रस्थापित करणे आणि वंचित घटकांच्या न्यायासाठी विविध उपक्रम राबवत आहे.हमीद इस्माईल तडवी यांच्या नियुक्तीबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## हरित भविष्यासाठी श्री. कॉम्प्युटरचा पुढाकार; नेमगिरी संस्थानात वृक्षारोपण



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत श्री. कॉम्प्युटर, जिंतूर यांच्या वतीने श्री नेमगिरी संस्थान येथे वृक्षारोपणाचा प्रेरणादायी उपक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री नेमगिरी संस्थानचे अध्यक्ष श्री. विरेंद्रकुमार सावजी कळमकर होते.यावेळी पोलीस निरीक्षक नामदेव रेड्डी, अमित शिराळकर, श्री. कॉम्प्युटरचे संचालक संतोष चौधरी,डॉक्टर असोसिएशन तालुकाध्यक्ष डॉ. शिवप्रसाद सानप, पत्रकार सचिन रायपत्रीवार, महेश देशमुख व शंतनु कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते विविध प्रजातींच्या वड, पिंपळ, गुलमोहर, बेल, निलगिरी, जाबूल, आदी आयुर्वेदिक वृक्षांचे रोपण करण्यात आले.यावेळी संतोष चौधरी यांनी 100 हून अधिक वृक्षांची लागवड व संगोपन करण्याचा संकल्प जाहीर केला. वाढते प्रदूषण, घटते हरित क्षेत्र आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक नागरिकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन मान्यवरांनी केले. तसेच महाराष्ट्र AI रेडी या मोफत कोर्स चे सर्टिफिकेट मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करिता संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी सौ. नवले मॅडम, कळुजी राऊत, विद्यार्थी, वाघ, पर्यावरणप्रेमी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी आयोजकांनी उपस्थितांचे आभार मानले.




## अकरावीच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयात अकरावी इयत्तेत नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अन्विता अग्रवाल होत्या. यावेळी प्रवेश समिती प्रमुख डॉ. शिला जिरे, पर्यवेक्षक रविंद्र परभाणे, प्रा. मंगल मोरे, प्रा. त्रिपती वरपडे आणि प्रा. शाम घोरतळे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थिनींनी स्वागतगीत सादर केले. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्राचार्य डॉ. अन्विता अग्रवाल व प्राध्यापकांच्या उपस्थितीत बारावीच्या विद्यार्थ्यांनी अकरावीच्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ व चॉकलेट देऊन स्वागत केले. त्यानंतर प्राचार्य डॉ. अग्रवाल यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक परंपरा, गुणवत्ता, शिस्त, विविध उपक्रम तसेच विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या संधींची सविस्तर माहिती दिली. नियमित अभ्यासासोबतच व्यक्तिमत्त्व विकास, स्पर्धा परीक्षा, क्रीडा, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.यावेळी प्रा. मंगल मोरे यांनी महाविद्यालयाची ओळख करून देत महाविद्यालयीन जीवनातील जबाबदाऱ्या, वेळेचे नियोजन, शैक्षणिक उत्कृष्टता आणि नैतिक मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत महाविद्यालयीन जीवनाची सकारात्मक सुरुवात करण्याचा निर्धार व्यक्त केला.प्रेरणादायी स्वागत व मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. प्रास्ताविक पर्यवेक्षक रविंद्र परभाणे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शिला जिरे यांनी, तर आभारप्रदर्शन प्रा. त्रिपती वरपडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी प्रतिनिधींनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १५ जुलै २०२६


## कांगारू

तपकिरी करडा
कांगारूचा रंग
आखूड समोरचे पाय
लवचिक अंग

संतुलन राखण्यासाठी
शेपटी असते लांब
सतत उड्या मारतोस
थोडा तरी थांब

मादी कांगारूचे पिल्लू
आईच्या पिशवीत बसते
बाहेर तोंड काढून
मजेत छान हसते

स्वभावाने तो शांत
शुद्ध शाकाहारी
पाने, गवत खाऊन
करतो आपली न्याहारी

बळकट व लांब
मागचे दोन पाय
उड्या मारत पळण्याचे
गुपित तरी काय?



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**

## लढ तू जिद्दीने !

पुन्हा जोमाने तू लढ,
संकटांचा येतो पूर.
संकटांना घाबरून,
आता पळू नको दूर. 1

प्रतिकूल परिस्थिती,
संधी निर्माण करते.
संकटांशी लढण्याचे,
मनी साहस भरते. 2

शक्तीनिशी वार कर,
यश तुलाच मिळेल.
तुझ्या क्षमतांचा दम,
साऱ्या जगास कळेल. 3

जिंकणार आहेस तू,
आता लढ तू जिद्दीने.
तुझी ओळख होईल,
तुझ्या यशाच्या सिद्धीने. ४

संकटांचं काय मित्रा,
सदा येतात जातात.
झाल्यावर यशस्वी तू,
सारे गोडवे गातात. 5



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# देवगिरी महाविद्यालयात इ.अकरावीच्या विद्यार्थ्यांचा "प्रवेशोत्सव" उत्साहात साजरा



***फोटो कॅप्शन :*** *अकरावी प्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत करताना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ छत्रपती संभाजीनगरचे विभागीय अध्यक्ष श्री.अनिल साबळे,प्राचार्य डॉ. रवी पाटील, उपप्राचार्य प्रा.अरुण काटे, जेईई-नीट सेलचे संचालक प्रा.एन.जी.गायकवाड, उपप्राचार्य प्रा.ज्ञानेश्वर हिवरे व उपस्थित मान्यवर*

**छत्रपती संभाजीनगर :** गेल्या वर्षीपासून अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने झाली शिक्षण विभागाने दिलेल्या निर्देशानुसार इ. अकरावीच्या तासिका दि.१३ जुलै २०२६ रोजी सुरू झाल्या आहे. याचे औचित्य साधून देवगिरी महाविद्यालयात प्रवेशित झालेल्या इ.अकरावीच्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव दि. १३ जुलै २०२६ रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्येची देवता सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे आनंदाने स्वागत करून त्यांच्या मनात शिक्षणा विषय गोडी-आवड निर्माण करणे, पालकांमध्ये जनजागृती करणे आणि विद्यार्थी, शिक्षक, पालक यांच्यात घट्ट नातं जोडलं जावं, त्यांच्यात विचारांची आदान प्रदान व्हावी, संवाद घडावा विद्यार्थ्यांच्या मनातील भीती व दडपण दूर करून आनंददायी आणि उत्साही वातावरण तयार करणे, महाविद्यालय व पालक यांच्यात सुसंवाद घडवून आणणे हा या उत्सवाचा मुख्य उद्देश आहे. महाविद्यालयात येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला महाविद्यालयाचा हा पहिला दिवस आठवणीत राहावा व महाविद्यालयाशी त्यांचे ऋणानुबंध जोडले जावे, प्रत्येक विद्यार्थ्याला आपण या महाविद्यालयाचा महत्त्वाचा हिस्सा आहोत ही भावना निर्माण करण्यासाठी नवागत विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या वतीने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ छत्रपती संभाजीनगरचे विभागीय अध्यक्ष श्री.अनिल साबळे,प्राचार्य डॉ. रवी पाटील, उपप्राचार्य प्रा.अरुण काटे, जेईई-नीट सेलचे संचालक प्रा.एन.जी.गायकवाड, उपप्राचार्य प्रा.ज्ञानेश्वर हिवरे यांनी गुलाब फुलांच्या पाकळ्यांचा वर्षाव करून व माहिती पुस्तिका भेट देऊन स्वागत करण्यात आले. नवी ध्येये, नवी क्षितिजे मिळवण्यासाठी व त्यांच्या शैक्षणिक वाटचालीसाठी याप्रसंगी मान्यवरांकडून शुभेच्छा देण्यात आल्या.

# 'लाडकी बहीण' योजनेत कोणीही वंचित नको




**छत्रपती संभाजीनगर :** तांत्रिक अडचणींमुळे 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या लाभापासून वंचित राहिलेल्या महिलांसाठी के. वाय. सी. (KYC) प्रक्रिया पूर्ण करण्यास मुदतवाढ द्यावी व विशेष शिबिरे आयोजित करावीत,अशी आग्रही मागणी केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष विजय म्हस्के पाटील यांनी केली आहे.यासंदर्भात त्यांनी महिला व बालविकास मंत्री आदितीताई तटकरे यांना ईमेलद्वारे पत्र पाठवले. सिल्लोड तालुक्यासह राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागात इंटरनेटची संथ गती, बँक खात्याशी आधार लिंक नसणे आणि बायोमॅट्रिक मशीनवर अंगठ्याचे ठसे न जुळणे (Biometric issues) यांमुळे हजारो पात्र महिलांना अद्याप लाभ मिळालेला नाही. या संवेदनशील विषयाची दखल घेऊन मंत्री आदिती तटकरे यांनी स्थानिक प्रशासन व बँकांना तात्काळ विशेष कॅम्प (शिबिरे) घेण्याचे निर्देश द्यावेत, जेणेकरून राज्यातील एकही पात्र भगिनी या लाभापासून वंचित राहणार नाही, अशी विनंती म्हस्के पाटील यांनी पत्रात केली आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १५ जुलै २०२६


## 'एक पेड मा के नाम' उपक्रमांतर्गत इकरा बोरनार येथे वृक्षारोपण



**बोरनार (प्रतिनिधी) :** शासनाच्या 'एक पेड मा के नाम' या पर्यावरणपूरक उपक्रमांतर्गत इकरा एज्युकेशन सोसायटी संचलित अब्दुल मजीद सालार इकरा उर्दू हायस्कूल, बोरनार ता .जि. जळगाव येथे उत्साहपूर्ण वातावरणात वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला.कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे मुख्याध्यापक आरीफ मोहम्मद खान यांच्या हस्ते विविध प्रकारच्या सावलीच्या व फळझाडांच्या रोपांची लागवड करून करण्यात आली. यावेळी पर्यावरण संवर्धन, हरित परिसराची निर्मिती आणि पर्यावरणीय समतोल राखण्याचा संकल्प करण्यात आला.यानंतर विद्यार्थी-विद्यार्थिनींना वृक्षांची रोपे वाटप करण्यात आली. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आईच्या नावाने एक झाड लावून त्याचे संगोपन करावे, तसेच आपल्या घराच्या किंवा परिसराच्या आजूबाजूला वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणात योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले.यावेळी मार्गदर्शन करताना मुख्याध्यापक आरीफ मोहम्मद खान म्हणाले, "झाडे ही पृथ्वीचे सौंदर्य, शुद्ध पर्यावरण आणि भावी पिढ्यांच्या निरोगी जीवनाची हमी आहेत. प्रत्येकाने आपल्या आईच्या नावाने एक झाड लावून त्याचे जतन केले, तर तो आई प्रती कृतज्ञतेचा सर्वोत्तम सन्मान ठरेल आणि पर्यावरण संवर्धनालाही मोठी चालना मिळेल."हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील रोशन सर, मजहर सर, जव्वाद सर, फिरोज सर, आबिद सर, अमीर सर आणि सादीक सर यांनी विशेष सहकार्य केले. तसेच शिक्षकेतर कर्मचारी शेख आकिब, मुश्ताकभाई, शब्बीरभाई, युसूफभाई यांनीही कार्यक्रमाच्या नियोजनात व वृक्षारोपणात सक्रिय सहभाग नोंदविला.कार्यक्रमाच्या शेवटी लावण्यात आलेल्या प्रत्येक रोपाची नियमित देखभाल करण्याचा संकल्प करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षण, वृक्षारोपणाचे महत्त्व आणि वृक्षसंवर्धनाविषयी जनजागृती करण्यात आली. उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक करून तो समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले.

## विशेष शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज सादर करावेत

**बीड (भगवंत पाळवदे) :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत (मर्या.) राबविण्यात येणाऱ्या विशेष शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन बीड जिल्हा कार्यालयाकडून करण्यात आले आहे. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय आणि अभियांत्रिकी अशा विविध अभ्यासक्रमांमध्ये ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या मातंग समाज व तत्सम १२ पोटजातींमधील गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. पात्र विद्यार्थ्यांनी आपले अर्ज आवश्यक कागदपत्रासह दि. २३ जुलै २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.या योजनेअंतर्गत निधीच्या उपलब्धतेनुसार प्रत्येक अभ्यासक्रमातील प्रथम ३ ते ५गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात येणार आहे. ही शिष्यवृत्ती महामंडळाकडून विद्यार्थ्यांची ज्येष्ठता आणि सर्वाधिक गुण क्रमांकानुसार उपलब्ध निधीच्या अधीन राहून मंजूर केली जाईल. विहित मुदतीनंतर म्हणजेच २३ जुलै २०२६ नंतर आलेल्या कोणत्याही अर्जांचा किंवा कागदपत्रांचा जिल्हा कार्यालयामार्फत स्वीकार केला जाणार नाही, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. पात्र विद्यार्थ्यांनी वरील सर्व कागदपत्रांच्या दोन प्रतींसह साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), बीड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय विश्रामगृहासमोर, बीड या जिल्हा कार्यालयाच्या पत्त्यावर वेळेत संपर्क साधून आपले अर्ज दाखल करावेत. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे

## मुख्यमंत्री सचिवालय (जनसंपर्क कक्ष)

**बीड (भगवंत पाळवदे) :** मंत्रिमंडळ निर्णय (संक्षिप्त) दापचरी येथे उभारणार आंतरराष्ट्रीय दर्जाचा कृषी बाजार. दुग्ध प्रकल्पाची ५५८.४३ हेक्टर जमीन देण्याचा निर्णय. पालघर जिल्ह्यातील मौजे दापचरी ( ता.डहाणू) येथील दुग्ध प्रकल्पाची जमीन महाराष्ट्र राज्य कृषि पणन महामंडळास देण्यास मंजुरी. याठिकाणी आंतराष्ट्रीय दर्जाच्या कृषि बाजार उभारणीसह पणन विषयक सुविधा निर्माण करण्यात येणार. पालघर, ठाणेसह परिसरातील शेतकऱ्यांना सुविधेचा मोठा लाभ होणार. (सहकार व पणन)शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी मोठा दिलासा. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६च्या निकषात सुधारणा. २०१९ च्या कर्जमाफी योजनेतील सुमारे 13 लाख शेतकऱ्यांसाठीची पन्नास हजार रुपयांपर्यंतची मर्यादा रद्द करून, नियमित कर्जमाफी. सन २०२६-२७ मधील नियमित परतफेडीची अट रद्द केल्याने 23 लाख शेतकऱ्यांनाही मिळणार प्रोत्साहनपर लाभ. (सहकार व पणन विभाग)राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालमत्तांसाठी मुद्रीकरण धोरण मंजुर. यामुळे मालमत्तांच्या वापरातून पारदर्शक आणि आणखी चांगले उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करता येणार. अल्पकालीन व दीर्घकालीन अशा नियोजनातून महापालिका, नगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायतींना मिळकतीचे उपाय शोधता येणार. (नगर विकास विभाग)राज्यात केंद्र शासन पुरस्कृत अर्बन चॅलेंज फंड अभियान राबविण्यात येणार. शहरांना दर्जेदार पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी बाजाराधारित वित्तपुरवठा मिळविता येणार. (नगर विकास विभाग)बीड जिल्हा क्रीडा संकुलाच्या २४ कोटी ९५ लाख रुपयांच्या कामांना मंजुरी. क्रीडा संकुलात सिंथेटीक ॲथलेटीक ट्रॅक, फुटबॉल, हॉकी मैदान, व्हॉलीबॉल, कब्बडी, खोखो मैदान, इनडोअर हॉल इमारत अद्ययावतीकरण, वसतिगृहाच्या तिसऱ्या मजल्याचे बांधकाम, रेनवॉटर हार्वेस्टींग करणे, विविध खेळाची मैदानांचा समावेश. (क्रीडा विभाग)अपराधी परिविक्षा अधिनियम, १९५८ अंतर्गत मुक्तबंदी व परिविक्षाधीन बंदी यांना देण्यात येणाऱ्या सहायक अनुदान योजनेच्या रक्कमेत दुप्पटीने वाढ. निर्दोष सुटलेल्या बंद्यांचा योजनेत समावेश करुन योजनेअंतर्गत सहायक अनुदान आता पंचवीस वरून पन्नास हजार रुपये इतकी वाढ. (महिला व बाल विकास)महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या – एसटीच्या राज्यभरातील अतिरिक्त जागांचा विकास होणार. पीपीपी तत्वावर जिल्हा, तालुका व ग्रामीण भागातील बसस्थानक व महामंडळाच्या जागांचा विकास करण्यास मान्यता (गृह – परिवहन विभाग)महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, 2013 मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी ( महसूल व वन विभाग)


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १५ जुलै २०२६

## बीड क्रीडा संकुलासाठी २४.९५ कोटींचा निधी

**मुंबई, बीड (भगवंत पाळवदे)** : बीड येथील जिल्हा क्रीडा संकुलाच्या उभारणीला गती देणारा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. क्रीडा संकुलाच्या २४.९५ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास आणि निधी मंजुरीस आज मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कार्यकाळात या क्रीडा संकूलाच्या उभारणीला प्रशासकीय मंजूरी देण्यात आली होती. उपमुख्यमंत्री, क्रीडा मंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी या क्रीडा संकुलाच्या निधीसाठी सातत्याने केलेल्या विशेष पाठपुराव्यामुळेच हा मार्ग मोकळा झाला आहे.बीड जिल्ह्यातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी या क्रीडा संकुलाचे काम हाती घेण्यात आले आहे. या क्रीडा संकुलाकरिता यापूर्वी ८ कोटी रुपये इतका निधी आधीच वितरित करण्यात आला होता. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाकडून सादर करण्यात आलेल्या २४.९९ कोटी रुपये किमतीच्या अंदाजपत्रकास विशेष बाब म्हणून उच्च स्तरीय सचिव समिती तसेच राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली होती. या मंजुरीच्या अनुषंगाने, ३१ मार्च २०२६ च्या शासन निर्णयान्वये २५ कोटी रुपये इतका निधी आधीच वितरित करण्यात आला आहे.उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा विशेष पुढाकार- बीड जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी आणि स्थानिक तरुण खेळाडूंना दर्जेदार पायाभूत सुविधा मिळवून देण्यासाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या सुरुवातीपासूनच आग्रही होत्या. या संकुलाच्या निधी वितरणात व प्रशासकीय मंजुऱ्यांमध्ये येणारे अडथळे दूर करून, अंदाजपत्रकाला मंत्रिमंडळाची अंतिम कार्योत्तर मान्यता मिळवून देण्यात त्यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे.मंत्रिमंडळाच्या आजच्या या निर्णयामुळे बीड जिल्हा क्रीडा संकुलाच्या उर्वरित कामांना मोठी गती मिळणार असून, या भागातील क्रीडा संस्कृतीला अधिक बळ मिळेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी व्यक्त केला.

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)

विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

## सुकामेवा चोरीप्रकरणी तिघांना कार सह अटक सात लाखांचा मुद्देमाल जप्त




**दौलताबाद (जावेद अहेमद)** : दौलताबाद पोलिसांनी सुकामेवा चोरीच्या गुन्ह्याचा अवघ्या काही तासात छडा लावत तिघा आरोपींना अटक केली असून, त्यांच्याकडून चोरीतील मुद्देमालासह गुन्ह्यात वापरलेली कार असा एकूण 7 लाख १ हजार ७८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कुशल सुभाषचंद्र जोशी यांचे करोडी शिवारात 'वृषभ गृह उद्योग' या नावाने पॅकिंगचे गोदाम आहे. दि. ७ जुलै रोजी रात्री सुमारे १० वाजता त्यांनी नेहमीप्रमाणे गोदामाला कुलूप लावून घरी गेले होते. त्यानंतर दि. १० जुलै रोजी सकाळी गोदामात आले असता शटर उचकटलेले दिसले. आत जाऊन पाहणी केली असता गोदामातील दोन लाख सतरा हजार रुपयांचे खारीक, खोबरे, काजू, बदाम आदी सुकामेवा अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. यप्रकरणी त्यांनी दौलताबाद पोलीस ठाण्यात चोरीची तक्रार दाखल केली.गुन्हा दाखल होताच पोलीस निरीक्षक नितीन खंडागळे यांनी डी.बी. पथकाचे पोलीस उपनिरीक्षक अजित दगडखेर यांना तपासाची जबाबदारी दिली. तपासादरम्यान डी. बी. पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी चोरीचा मुद्देमाल विक्रीसाठी छत्रपती संभाजीनगरकडे घेऊन जाणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळा-ली खुलताबाद - छत्रपती संभाजीनगर मार्गावरील अब्दीमंडी हद्दीतील समृद्धी महामार्ग पुलाखाली सापळा रचला. सोमवारी (दि. १३ जुलै) रात्री 9.५० ते १०.०५ या वेळेत संशयित वाहन अडवून त्यातील तिघा आरोपींना ताब्यात घेतले. झडतीदरम्यान चोरीतील मुद्देमाल तसेच गुन्ह्यात वापरलेली कार जप्त करण्यात आली. यात अटक करण्यात आलेले आरोपींची रियाज रशीद शेख (वय ३२, रा. अजवा नगर, वाळूज), अस्लम बाबू पठाण (वय ३५, रा. भारत नगर, वाळूज), विकास कल्याण गायकवाड (वय २३, रा. गणेश नगर, वाळूज) आरोपींकडून चोरीतील २ लाख १ हजार ७८० रुपयांचा सुकामेवा तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेली पांढऱ्या रंगाची निसान मॅग्नाईट (क्र. MH-१४-J-५९८३), किंमत अंदाजे ५ लाख रुपये, असा एकूण ७ लाख १ हजार ७८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक नितीन खंडागळे, पोलीस उपनिरीक्षक अजित दगडखेर व डी.बी. पथकाचे खुशाल पाटील,बंडू गोरे,वैशाली ढेपे,सुमेध पवार,अविनाश बरवंट यांनी केली आहे पुढील तपास पोलीस अंमलदार बी एल अहिरे हे करत आहे